# साखरोली मोहल्ल्यात घर बेचिराख

## ७१ लाखांची हानी, जीवितहानी टळली
## तीनही कुटुंबे बेघर, महावितरणवर ठपका?

**खेड (प्रतिनिधी) :** तालुक्यातील साखरोली मोहल्ला येथील एक घर आगीत बेचिराख झाले. शॉर्टसर्किटने ही आग लागली होती. त्यात ७१ लाखांची हानी झाली असून या घरातील तीनही कुटुंबे बेघर झाली आहेत. शनिवारी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. सुदैवाने जीवितहानी झाली नाही.

मीटर स्पार्किंगची वारंवार तक्रार देऊनही त्याची दखल घेतली न गेल्यामुळे ही आग लागल्याचा आक्षेप घेतला जात आहे. त्यामुळे महावितरणच्या कारभाराबाबत तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. लोटे औद्योगिक वसाहतीच्या अग्नीशामक दलाने ही आग आटोक्यात आणली.

तालुक्यातील साखरोली मोहल्ला येथील इब्राहिम अब्दल्ला परकार यांच्या नावे आहे. ते हयात नाहीत. त्यांच्या पश्चात या घरात त्यांचे मुलगे हुसेन इब्राहिम परकार, दाऊद इब्राहिम परकार व पुतण्या बशीर महंमदअली परकार अशी तीन कुटुंबे राहतात. घरातील सर्व पुरूष मंडळी नोकरीनिमित्त परदेशी असतात.

श्री. परकार यांच्या घरगुती असलेल्या वीज मीटरमधून स्पार्किंग होत होते. याबाबतची तक्रार एक महिन्यापूर्वी महावितरणकडे देण्यात आली होती. एवढेच नव्हे तर ७ व ८ एप्रिलला पुन्हा तक्रारी देण्यात आल्या होत्या. मात्र याची कोणतीच दखल महावितरणकडून घेण्यात आलेली नाही.

शनिवारी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास ही आग लागली. नेमके काय करावे? हे सुचण्याच्या आतच घरातील सर्व मालमत्ता जळून खाक झाली. महसूल खात्याने केलेल्या पंचनाम्यानुसार ३ फ्रीज (४० हजार रूपये), ३ टी.व्ही (२८ हजार रूपये), ३ ओव्हन (४५ हजार रूपये) ६ सिलेंडर (६ हजार रूपये), स्टीलच्या ३ शेगड्या (१० हजार रूपये), ११ पंखे (११ हजार रूपये), ए. सी (२२ हजार रूपये), गोदरेज कंपनीची ६ कपाटे (३० हजार रूपये), ६ पलंग (६० हजार रूपये), ९ लाकडी कपाटे (७२ हजार रूपये), ३ डायनिंग टेबल्स (१५ हजार रूपये), १८ खुर्च्या (१८ हजार रूपये), तिन्ही कुटुंबांचा घरातील सर्व कपडालत्ता (सुमारे २ लाख रूपये), घड्याळे (१० हजार रूपये), १६० तोळे सोने (२७ लाख २० हजार रूपये), स्वयंपाकाच्या भांड्यांसह किचनमधील साहित्य (१ लाख ५० हजार रूपये), ३ वीज मीटर (१५ हजार रूपये), रोख रक्कम (१ लाख २० हजार रूपये), ३ वॉशिंग मशिन (२१ हजार रूपये) तसेच सागवानी लाकडासह कौले व इतर वस्तूंसहा घराचे नुकसान ३५ लाख रूपये असे एकूण ७० लाख ९३ हजार इतके नुकसान झाले आहे.

या कुटुंबातील खलील हुसेन परकार या तरूणाचे नुकतेच लग्न झाले आहे. त्याची पत्नी सौ. समिना हिचे सगळे दाग-दागिने, कपडेलत्ते, रूखवातीसह जळून खाक झाल्याचेही यावेळी पान २ वर...

## साखरोली मोहल्ल्यात घर बेचिराख

सांगण्यात आले. जि. प. सदस्य संजय कदम, खेड शहर राष्ट्रवा
अध्यक्ष निसार खतीब, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष अण्णा सावंत, राष्ट्
जिल्हा सरचिटणीस मुश्ताक दळवी आणि काँग्रेसचे जिल्हा उपाध्य
काँग्रेस अल्पसंख्यांक सेलचे जिल्हाध्यक्ष महामूदभाई पालेकर, राष्ट्रव
कय्युम परकार, हर्षदिप सासने यांनी घटनास्थळी जाऊन संबंधित कुटुं
सांत्वन केले.

झालेल्या प्रकाराबद्दल जि. प. सदस्य संजयराव कदम
महावितरणचे शाखा अभियंता दीपक देवरे यांना चांगलेच धारेवर धरल

लोटे एमआयडीसीतील अग्नीशमक बंबावरील पी. पी. पाटील, चा
बी. बी. वरेकर, फायरमन श्री. अधिकारी, श्री. ओवळेकर, श्री. मे
श्री. झाजम यांनी केलेल्या परिश्रमांमुळे आग लवकर आटोक्यात आ

Dainik Prahar 10th April 2010